# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक २३.११.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि २२/११/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २५३ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन १,४५,३५०/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि.२२/११/२०२२ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण २४ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतां कडुन ११७.५४ लिटर दारू असा एकुण १,३८,८४०/—रू.किमतीचा अवैध दारूसाठा जप्त तसेच नाश करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**ई सी ॲक्ट सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये दि. २२/११/२०२२ रोजी **ई सी ॲक्ट** अंतर्गत कुरंदा पोस्टे अंर्तगत वाई फाटयाजवळ महाराष्ट्र शासनाकडुन गोरगरीबांना शिधा पत्रीकेवर दिला जाणारा राशनचा स्वस्त धाण्य दुकानातील तांदुळ हा काळया बाजारात विक्री करण्याच्या उददेशाने घेवुन जातांना मिळुन आल्याने .कार्यवाही करून आरोपीतां कडुन ६८०००रू किंमतीचे पांढ—या रंगाचे नायलोनचे पोत्यामध्ये महाराष्ट्र शासनाकडुन गोरगरीबांना शिधा पत्रीकेवर दिला जाणारा राशनचा तांदुळाचे ८१ पोते वजन अंदाजे ४० क्विंटल व एक अशोक लेलॅंड बडा दोस्त कंपनीचे ज्या वाहनाचा असा एकुन १०६८००० रू चा माल जप्त करण्यात येवुन पुढील तपास कुरंदा पोलीस करित आहेत.

**अपघात** :—दिनांक २२/११/२०२२ रोजी कलम कलम २७९,३३७,३३८ भादवी अन्वये पोस्टे वसमत ग्रामीण येथे ०१ गुन्हा दाखल असुन पुढील तपास वसमत ग्रामीण पोलीस करित आहेत.

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि २२/११/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकाविरूध्द २८३ मोवाका अन्वये एकुण ०४ ठिकाणी कार्यवाही करण्यात आली.

**अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या विरूध्द विशेष मोहिम :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या विरूध्द विशेष मोहिम अंतर्गत दि.२२/११/२०२२ रोजी भारतीय शस्त्र अधिनियम अंतर्गत हिंगोली जिल्हयात पोस्टे हिंगोली शहर येथे ०१ अशा एकुण ०१ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतां कडुन अवैध शस्त्र जप्त करण्यात आले असुन आरोपीतां विरूध्द भारतीय शस्त्र अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.